सत्यमेव जयते | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग

राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय

डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड पुणे – ४११ ००१

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य पुणे -१

संकेतस्थळ: arogya.maharashtra.gov.in
कार्यालय : ०२० - २६०५९५३०
नानोप विभाग: ०२० – २६०५८२९२
ई- मेल: crs_d81@yahoo.com

**आरोग्य सेवा**

जा.क्र.आमाजीआ/ना.नो.प/ कक्ष ८१ /जुने ज.मृ. नोंदणी /15394-402 /२५
दिनांक - 23/ १२/ २०२५

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी तथा
**जिल्हा निबंधक जन्म मृत्यू,**
जिल्हा परिषद, ............ (सर्व)

विषय :- ADD OLD BIRTH/DEATH EVENT याद्वारे जुने जन्म व मृत्यू प्रमाणपत्र यांची नोंद ग्रामीण व शहरी संस्थाचा आढावा घेण्याबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास सूचित करण्यात येते की, जन्म व मृत्यू घटनांची नोंदणी करण्यासाठी केंद्र शासनाने सुधारित संगणक प्रणाली CRS पोर्टल ही दिनांक 24 जून 2024 रोजी राज्यात कार्यान्वित केली. सदर संगणक प्रणालीमध्ये आपल्या कार्यक्षेत्रातील निबंधक जन्म व मृत्यू यांनी इतर माध्यमातून नोंदणी केलेल्या घटना (उदा. हाताने, संग्राम, सर्विस प्लस, मायनेट इ.) द्वारे वितरीत केलेले जुने जन्म मृत्यू प्रमाणपत्र केंद्र शासनाच्या CRS पोर्टल वरील ADD OLD BIRTH EVENT / ADD OLD DEATH EVENT याद्वारे समाविष्ट करण्याबाबत वेळोवेळी आपणास सूचित करण्यात आलेले आहे. तथापि, काही ठिकाणी चुकीच्या पद्धतीने जन्म व मृत्युची नोंदणी उपलब्ध नसताना देखील OLD EVENT मध्ये सदर नोंदणी करण्यात येत आहे व त्यानुसार चुकीची प्रमाणपत्र वितरित झालेले आहेत. तथापि, जिल्हा निबंधक यांनी जिल्हास्तरावर सर्व कायदेशीर old birth/death नोंदी तात्काळ ऑनलाइन पोर्टल वर रजिस्टर करणे बंधनकारक आहे तसेच ज्या नोंदी चुकीच्या नोंदविण्यात येत आहेत त्यांच्यावर कार्यवाही करावी व निबंधक यांनी यापूर्वी वितरीत केलेले जुन्या जन्म व मृत्यू घटनांच्या सर्व नोंदी ADD OLD BIRTH EVENT / ADD OLD DEATH EVENT ह्या CRS पोर्टल वरील टॅब वर तत्काल नोंदविण्यात याव्यात.

१) ग्रामपंचायत निबंधक यांनी इतर पद्धतीने (उदा. हाताने, संग्राम, सर्विस प्लस, इ.) द्वारे नोंदणी केलेल्या घटना केंद्र शासनाच्या संगणक प्रणालीत ADD OLD BIRTH EVENT / ADD OLD DEATH EVENT याद्वारे वर्षनिहाय समाविष्ट करव्यात.

२) तसेच प्रत्येक निबंधकाकडे किती वर्षापासून च्या जुन्या नोंदणी करावयाच्या आहेत व एकूण जन्म व मृत्यू च्या किती वर्षाच्या जुन्या नोंदणी केलेल्या आहेत आणि किती करावयाच्या शिल्लक आहेत यांची आकडेवारी गटविकास अधिकारी तथा अपर जिल्हा निबंधक व उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांनी सर्व जिल्ह्यातिल ग्रामीण भागाची माहिती एकत्रित व सांक्षाकित करून जिल्हा स्तरावर देण्यात यावी.

३) शहरी भागातील संस्थानी सुद्धा वरीलप्रमाणेच त्यांच्या स्तरावर किती वर्षापासून च्या जुन्या नोंदणी करावयाच्या आहेत व एकूण जन्म व मृत्यू च्या किती वर्षाच्या जुन्या नोंदणी केलेल्या आहेत आणि करावयाच्या शिल्लक आहेत यांची आकडेवारी (वॉर्ड) निहाय सांक्षाकीत करून जिल्हा स्तरावर आरोग्य अधिकारी मनपा यांनी द्यावी.

४) ग्रामीण व शहरी निबंधक जन्म मृत्यू यांनी प्राप्त झालेल्या जन्म/मृत्यू घटनेची नोंदणी केली नसल्यास सदर घटनेची नोंदणी ADD OLD BIRTH EVENT / ADD OLD DEATH EVENT याद्वारे घेण्यात येऊ नये. त्यासाठी उशिरा नोंदणीचा कलम 13(1) (2) (3) नुसार कार्यवाही करावी.

५) जर निबंधक यांनी केंद्रशासनाच्या संगणक प्रणालीत ज्या दिवसापासून नोंदणी करण्यास सुरवात केलेली आहे त्या दिवसाच्या आधीची दिनांक ADD OLD BIRTH EVENT/ADD OLD DEATH EVENT नोंदणी करण्यासाठी उपलब्ध होते. (उदा. दिनांक 25 जुन 2023 रोजी केंद्रशासनाच्या संगणक प्रणालीत नोंदणी केली असल्यास दिनांक 24 जून 2023 या दिनांकापासून मागील **नोंदणी केलेल्या जन्म मृत्यू घटनांची नोंद** ADD OLD BIRTH EVENT/ADD OLD DEATH EVENT करता येईल.)

६) १२ एप्रिल २०१८ च्या अधिसूचने नुसार राज्यातील शासकीय आरोग्य संस्थाचे प्रमुख हे निबंधक जन्म व मृत्यू घोषित झाले परंतु केंद्र शासनाच्या संगणक प्रणलीत १ जानेवारी २०२० पासून जन्म मृत्यू घटनांच्या नोंदणी करण्यास सुरवात झाली.

७) जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी त्यांच्या Login मधून Digitization Report याद्वारे सर्व संस्थांची माहिती काढून जर शासकीय आरोग्य संस्था यांनी ADD OLD BIRTH EVENT / ADD OLD DEATH EVENT यामध्ये नोंदणी केलेली असल्यास याबाबत संबंधित संस्थेची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतींचा अहवाल एकत्रित करून पाठवावा.

८) सर्व जिल्हा निबंधक यांनी कार्यक्षेत्रातील कोणत्याही शासकीय आरोग्य संस्थेत अशा प्रकारे केलेल्या नोंदणीबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक यांनी त्वरित चौकशी करून उचित कार्यवाही करावी

वरीलप्रमाणे सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म मृत्यू यांनी CRS पोर्टल मधील जन्म व मृत्यू नोंदणीचा आढावा घेण्यात यावा.

आपल्या जिल्ह्यात जुन्या जन्म-मृत्यू घटना नोंदणीचा तपशील CRS पोर्टल वरून प्रपत्र अ व प्रपत्र ब मध्ये दिनांक २६/१२/२०२५ पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

सोबत प्रपत्र अ व प्रपत्र ब जोडले आहे.

22/12/2025

(डॉ. बबीता कमलापूरकर)
उपसंचालक आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ.)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यू,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादरः-**

१) उपसंचालक आरोग्य सेवा,परिमंडळे (सर्व)
/- मंडळातील सर्व जिल्हयांची माहिती वरील प्रपत्र अ व ब सादर करण्याबाबत आढावा घेणे.
२) वैद्यकीय आरोग्य अधिकारी मनपा/ मुख्याधिकारी नगरपालिका/ नगरपंचायत (सर्व)

**प्रत माहितीस्तव सविनय सादरः-**

१) मा. आयुक्त, आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक रा.आ. अ, मुंबई.
२) मा. संचालक, जनगणना कार्यालय, मुंबई.
३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४) मा. संचालक (रुग्णालय), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५) मा. संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यू, पुणे.

# Add Old Birth Registration Report

## प्रपत्र अ

| अनू क्र | जिल्ह्याचे नाव | CRS पोर्टल मधील Add Old Registration यामध्ये नोंदणी करावयाच्या एकूण जुन्या जन्म नोंदणी | | | त्यापैकी CRS Portal मधील Add Old मध्ये केलेल्या जन्म नोंदणी | | | शिल्लक जन्म नोंदणी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण | |
| १ | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | |

# Add Old Death Registration Report

## प्रपत्र ब

| अनू क्रमांक | जिल्ह्याचे नाव | CRS पोर्टल मधील Add Old Registration यामध्ये नोंदणी करावयाच्या एकूण जुन्या मृत्यू नोंदणी | | | त्यापैकी CRS Portal मधील Add Old मध्ये केलेल्या मृत्यू नोंदणी | | | शिल्लक मृत्यू नोंदणी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण | |
| १ | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | |